| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : ०४/०९/२०२३ |
| नोंदणी केल्याचा दिनांक | : ०४/०९/२०२३ |
| निकालाचा दिनांक | : ०४/०५/२०२६ |
| कालावधी | : व. म. दि. |
| | ०२ ०८ ०० |

**निशाणी क्र. ४७**

**प्रपत्र क्र. ३२**

**भाग 'अ'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)]**

**सिंधुदुर्ग – ओरोस येथील**

# सत्र न्यायालयात

(डॉ सुधीर देशपांडे, सत्र न्यायाधीश यांचे समोर)

(निकालाचा दिनांक – ०४/०५/२०२६)

(सत्र खटला क्र. ४०/२०२३)

(**CNR No.MHSI**010006892023)

**फिर्याद/गुन्हा व पोलीस ठाणे यांचा तपशील –**

गु. र. क्र. ३३७/२०२२ दि. २२/१२/२०२२

भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ४/२५ अन्वये

**पोलीस ठाणे – कणकवली**

| | |
|---|---|
| **फिर्यादी**<br>(अभियोगपक्ष) | **महाराष्ट्र राज्य**<br>द्वारा: पोलीस ठाणे अधिकारी<br>पोलीस ठाणे, कणकवली |
| **प्रतिनिधीत्व** | **प्रभारी लोकअभियोक्ता श्री एस ए राणे** |

| | |
|---|---|
| आरोपी | **१) अजय मारूती पवार**<br>वय ३९ वर्षे, व्यवसाय – शेती<br>रा. सांगवे, बौध्दवाडी,<br>ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग<br>**२) सुनिल अनिल कांबळे**<br>वय २५ वर्षे, व्यवसाय – मोलमजुरी<br>रा. सांगवे, बौध्दवाडी,<br>ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग<br>**३) दिलीप दौलत कांबळे**<br>वय ५० वर्षे, व्यवसाय – शेती<br>रा. सांगवे, बौध्दवाडी,<br>ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग |
| **प्रतिनिधीत्व** | **उप मुख्य लोकअभिरक्षक श्रीमती यु ए पावसकर** |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २१/१२/२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २२/१२/२०२२ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | ०७/०७/२०२३ |
| आरोपींविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २८/०४/२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २३/०३/२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | ०४/०५/२०२६ |
| निकालाची तारीख | ०४/०५/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही |

## आरोपींचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अजय मारूती पवार | २२/१२/२०२२ | २१/०२/२०२३ |
| २ | सुनिल अनिल कांबळे | २२/१२/२०२२ | ०७/०१/२०२३ |
| ३ | दिलीप दौलत कांबळे | २२/१२/२०२२ | ०७/०१/२०२३ |

| दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करिता संपरीक्षेदरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |
| भा.दं.सं.कलम ३०७, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये | निर्दोष मुक्त केले | लागू नाही | लागू नाही |

## न्यायनिर्णय

(घोषीत केला दिनांक ०४ माहे मे, २०२६)

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी क्र. १ ते ३ यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०७, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि

शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ४/२५ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला आहे.

२] अभियोगपक्षाचा खटला संक्षेपाने असा आहे की, दि. २१/१२/२०२२ रोजी रात्री ९.०० वाजताचे सुमारास फिर्यादी हा सांगवे बौध्दवाडी येथील त्याच्या घरामध्ये असताना त्याला आरोपी अजय मारूती पवार हा जमीनजागेच्या कारणावरून शिवीगाळी करत असल्याचा आवाज आला. त्यावेळी त्याने त्याच्या घराच्या बाहेर कंपाऊंडमध्ये येवून त्याबाबत आरोपी अजयला विचारणा केली. त्यावेळी आरोपी अजय त्याच्या घरातून बाहेर आला आणि त्याने फिर्यादीला त्यांच्या जमिनीतून कंपाऊंड केल्याच्या कारणावरून शिवीगाळी करून ठार मारण्याची धमकी दिली आणि तलवारीने वार करून फिर्यादीच्या ओठावर व डाव्या हाताच्या मनगटावर दुखापत केली. त्यानंतर त्याठिकाणी आरोपी सुनिल कांबळे व दौलत कांबळे यांनी येवून त्याला शिवीगाळी करून ठार मारण्याची धमकी दिली आणि आरोपी सुनिल कांबळे याने त्याच्या हातातील लाकडी दांडा फिर्यादीच्या डोक्यावर मारून त्याला दुखापत केली. त्यावेळी फिर्यादीचा मुलगा सूरज त्याला सोडविण्याकरीता आला असता आरोपी अजयने त्याच्यावरही तलवारीने वार करून त्याच्याही डाव्या हाताच्या मनगटावर दुखापत केली व त्याला ठार मारण्याची धमकी दिली. सदरचे भांडण फिर्यादीची पत्नी, बहीण व शेजारी लोकांनी सोडविले. त्यानंतर फिर्यादी व त्याचा मुलगा यांनी रूग्णालयात जावून औषधोपचार घेतले. त्यामुळे फिर्यादीने सदरच्या घटनेबाबत आरोपींविरूध्द पोलीस ठाणे, कणकवली येथे प्रथम खबर दाखल केली. त्यानुसार आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

३] तपासकाम पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिका−याने आरोपींविरूध्द कणकवली न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटला हा केवळ सत्र न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याने, तो फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०९ अन्वये या न्यायालयाकडे सुपूर्द करण्यात आला. आरोपींविरुद्ध दोषारोप (निशाणी २४) निश्चित करण्यात आला. आरोपींनी सदर गुन्हा नाकारला, त्यामुळे त्यांच्याविरूध्द दोषसिध्दीसाठी अभियोगपक्षातर्फे खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाने एकूण सहा साक्षीदार तपासले. त्यानंतर अभियोगपक्षाने पुरावा बंद केल्याबाबत पुरशीस निशाणी ४३ दाखल करून न्यायालयास कळविले.

४] त्यानंतर आरोपींविरुद्ध दिसून येणाऱ्या परिस्थितीजन्य बाबींचा खुलासा करण्यासाठी आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये परीक्षण करण्यात आले. त्यामध्ये आरोपींनी, फिर्यादी व त्यांच्यामध्ये जमिनीवरून वाकडीक असल्याने फिर्यादीने खोटी फिर्याद दिली, त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही, असे उत्तर दिले.

५] त्यानंतर न्यायालयाने अभियोगपक्ष व बचावपक्ष यांचा युक्तिवाद ऐकून घेतला.

६] अभियोगपक्षातर्फे मा. लोकअभियोक्ता श्री राणे यांनी असा युक्तिवाद केला की, जरी सर्व साक्षीदार सहाय्यकारी ठरले नसले तरीही तपासी अधिका−याने तपासावर साक्ष दिल्याने योग्य तो न्यायनिर्णय पारीत व्हावा.

७] बचावपक्षातर्फे उप मुख्य लोकअभिरक्षक श्रीमती पावसकर यांनी असा युक्तिवाद केला की, सदरच्या खटल्यात एकाही साक्षीदाराने

आरोपींविरूध्द कोणताही पुरावा न दिल्याने तसेच कोणतीही घटना शाबीत न झाल्याने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

८] दोन्ही पक्षांकडील युक्तिवाद व पुरावा विचारात घेता माझ्या विचारार्थ खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून, त्यावरील निष्कर्ष मी पुढे कारणमिमांसेनुसार नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी समान हेतूने संबंधित वेळी व संबंधित ठिकाणी त्यांच्यावर दोषारोप निश्चिती झालेले गुन्हे केले होते काय? | | नकारार्थी. |
| २. | केवळ तपासी अधिका–यांच्या साक्षीवरून आरोपींना दोषी धरता येईल काय? | | नकारार्थी. |
| ३. | आदेश काय? | | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

### मुद्दे क्र. १ व २ बाबत

९] आरोपींच्या दोषसिध्दीकरीता अभियोगपक्षातर्फे सहा साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ राजेंद्र श्रीधर कांबळे हा खुद्द फिर्यादी असून, त्याने त्याचे सरतपासात सांगितले की, दि. २१/१२/२०२२ रोजी काही झाले नव्हते. त्याच्या हाताला लागले होते. तो डॉक्टरकडे गेला होता. बाकी काय झाले ते त्याला माहीत नाही. आरोपी अजय मारूती पवार हा

त्याचा शेजारी आहे. आरोपी अजय आणि त्याच्यामध्ये त्यादिवशी काही भांडण झाले नव्हते. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने मा. लोकअभियोक्ता यांच्याकडून त्याची उलटतपासणी सदृश सरतपासणी घेण्यात आली. त्यामध्ये फिर्यादीने त्याला आणि त्याच्या मुलाला जखमा झाल्याने त्यांनी वैद्यकीय उपचार करून घेतल्याचे सांगितले. फिर्यादीने प्रथम खबरीवरील केवळ तिची सही मान्य केली व इतर सर्व घटना, त्याची प्रथम खबर, आणि त्या प्रथम खबरीमधील मजकूर नाकबूल केला. तसेच त्याने पोलिसांना घटनास्थळ दाखविल्याचेही नाकबूल केले. त्याने तलवार आणि दांडा प्रथमच न्यायालयात पाहत असल्याचे सांगितले.

१०] साक्षीदार क्र. २ सूरज राजेंद्र कांबळे हा फिर्यादीचा मुलगा असून, त्याने त्याचे सरतपासात सांगितले की, दि. २१/१२/२०२२ रोजी आरोपी अजय पवार आणि त्याचे वडील यांच्यात काही झाले नव्हते. त्यादिवशी आरोपी अजय पवारने त्याला तलवारीने मारले होते, असे घडले नव्हते. त्याला जखम झाली नव्हती आणि त्याला दवाखान्यात नेले नव्हते. सदर साक्षीदारानेही अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने मा. लोकअभियोक्ता यांच्याकडून त्याची उलटतपासणी सदृश सरतपासणी घेण्यात आली. त्यामध्ये त्याने त्याचे जबाबातील भाग–ए खालील मजकूराबाबत त्याला माहिती नसल्याचे सांगितले. तिन्ही आरोपींनी त्याला कधीच मारहाण केली नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने देखील तलवार आणि दांडा प्रथमच न्यायालयात पाहत असल्याचे सांगितले.

११] साक्षीदार क्र. ३ राजश्री राजेंद्र कांबळे ही फिर्यादीची पत्नी असून तिने तिचे सरतपासात सांगितले की, दि. २१/१२/२०२२ रोजी काय झाले होते ते तिला माहीत नाही. तसेच दि. २१/१२/२०२२ रोजी तिचे पती आणि तिचा मुलगा यांना आरोपींनी तलवारीने मारहाण केली होती काय

आणि त्यांना दवाखान्यात नेले होते काय ते तिला माहीत नाही. तसेच ती मारामारी सोडवायला गेली होती काय, हे तिला आठवत नाही. सदर साक्षीदाराने देखील अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने मा. लोकअभियोक्ता यांच्याकडून तिची उलटतपासणी सदृश सरतपासणी घेण्यात आली. त्यामध्ये तिने तिचे जबाबातील भाग–ए खालील मजकूराबाबत तिला माहिती नसल्याचे सांगितले. तिन्ही आरोपींनी तिचे पती आणि मुलगा यांना कधीच मारहाण केली नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने देखील तलवार आणि दांडा प्रथमच न्यायालयात पाहत असल्याचे सांगितले. अशाप्रकारे उपरोक्त तिन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

१२] साक्षीदार क्र. ४ दत्ताराम अंकुश जाधव आणि साक्षीदार क्र. ५ अक्षय शांताराम बकाळकर हे दोन्ही पंच साक्षीदार असून त्यांनी देखील अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

१३] अभियोगाच्या पुराव्याचा एकंदरीत होरा पाहता बचावपक्षाने पुढीलप्रमाणे दस्त मान्य व कबूल केले: घटनास्थळाचा पंचनामा, फिर्यादी आणि साक्षीदार सूरज कांबळे यांची जखमेची वैद्यकीय प्रमाणपत्रे, आणि फिर्यादी, साक्षीदार आणि आरोपींच्या कपडे जप्तीचे पंचनामे. त्यामुळे अभियोगपक्षाने संबंधित दस्तांवरील साक्षीदार तपासले नाहीत.

१४] त्यानंतर अनिल काशिनाथ हाडळ या तपासी अधिका–याची साक्ष साक्षीदार क्र. ६ म्हणून घेण्यात आली. सदर तपासी अधिका–याने त्यांनी केलेल्या तपासकामावर साक्ष दिली. त्यांनी आरोपींना कोर्ट हॉलमध्ये ओळखल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराची बचावपक्षाने केवळ औपचारिक उलटतपासणी घेतली.

१५] भारतीय दंड संहिता कलम ३०७ अन्वये गुन्हा सिद्ध

होण्यासाठी आरोपीकडून मृत्यू घडविण्याचा ठोस हेतू (intention) किंवा अशा स्वरूपाचे ज्ञान (knowledge) असणे अत्यावश्यक आहे, तसेच त्यासाठी केलेली कृती ही स्वभावतः प्राणघातक असणे अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी स्वतः न्यायालयात साक्ष देताना आरोपींविरुद्ध कोणतीही घटना घडलेली नसल्याचे स्पष्टपणे नमूद करतो व त्याच्या फिर्यादीतील मजकूर नाकारतो. कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनीही आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करून मारहाण केल्याची घटना पाहिलेली नसल्याचे सांगितले आहे. वैद्यकीय पुराव्यातूनही जिवाला धोका निर्माण होईल अशा गंभीर दुखापती झाल्याचे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपींकडून मृत्यू घडविण्याचा निश्चित हेतू किंवा ज्ञान होते, हे अभियोगपक्ष विश्वसनीय व ठोस पुराव्याद्वारे सिद्ध करू शकलेला नाही. फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्त्वानुसार संशयाचा फायदा आरोपीस दिला जातो. परिणामी, कलम ३०७ अन्वये खून करण्याचा प्रयत्न झाल्याचे आवश्यक घटक शंकातीतपणे सिद्ध न झाल्यामुळे सदर गुन्हा घडलेला नाही, असे म्हणणे भाग पडते.

१६] अभियोगाच्या पुराव्याचा एकंदरीत होरा पाहता बचावपक्षाने घटनास्थळाचा पंचनामा, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे, आणि कपडे जप्तीचे पंचनामे मान्य व कबूल केले असले, तरी केवळ या औपचारिक कागदोपत्री बाबी मान्य केल्याने अभियोगपक्षाचा मूळ आरोप शंकातीत सिद्ध होत नाही. कारण पंचनामे हे केवळ परिस्थितीजन्य व पूरक स्वरूपाचे पुरावे असून ते गुन्ह्याची प्रत्यक्ष घटना किंवा आरोपींचा प्राणघातक हेतू सिद्ध करत नाहीत. घटनास्थळाचा पंचनामा हा त्या ठिकाणाची भौतिक स्थिती दर्शवितो; मात्र आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर जाणीवपूर्वक तलवारीने वार केले व त्यांचा मृत्यू घडविण्याचा हेतू होता, हे त्यातून सिद्ध होत नाही.

१७] तसेच जप्ती पंचनाम्यांमध्ये कपडे आणि निवेदन पंचनाम्यांमध्ये

तलवार आणि लाकडी दांडा हस्तगत केल्याचे नमूद असले, तरी त्या वस्तूंचा कथित गुन्ह्याशी थेट व अविभाज्य संबंध जोडणारा स्वतंत्र व विश्वासार्ह पुरावा अभावाने आहे. केवळ वस्तू जप्त झाल्या म्हणून आरोपींकडून खूनाचा प्रयत्न झाला, असा निष्कर्ष निघत नाही. त्या वस्तूंवरून आरोपींचा हेतू, कृतीची तिव्रता किंवा जिवघेणा परिणाम सिद्ध होत नाही.

१८] याउलट, फिर्यादी हा स्वतःच त्याच्या आधीच्या कथनास नकार देतो व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे देखील घटनेचे समर्थन करत नाहीत. अशा परिस्थितीत केवळ औपचारिक पंचनामे मान्य केल्यामुळे अभियोगपक्षाच्या प्रकरणातील मूलभूत त्रुटी दूर होत नाहीत. फौजदारी खटल्यात आरोपीचा दोष शंकातीत व ठोस पुराव्याने सिद्ध होणे आवश्यक असते. येथे हेतू, कृती आणि परिणाम यांचा आवश्यक दुवा (link) सिद्ध झालेला नसल्यामुळे बचावपक्षाने काही दस्तऐवज मान्य केले असले, तरी त्यातून कलम ३०७ अन्वये गुन्हा सिद्ध करण्यास अभियोगपक्षास कोणताही प्रत्यक्ष फायदा होत नाही. तसेच कलम ५०४ व ५०६ या गुन्ह्यांचे देखील घटक शाबीत झालेले नाहीत.

१९] शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा सिद्ध होण्यासाठी आरोपीने विना परवाना तलवार बाळगली, हे सिद्ध होणे आवश्यक आहे. उपलब्ध पुराव्यांवरून असे स्पष्ट होते की, अभियोगपक्षास कलम ४/२५ यांखालील आवश्यक घटक सिद्ध करण्यात अपयश आले आहे.

२०] एकंदरीत, ज्या कायद्यांच्या कलमांन्वये आरोपींवर खटला चालविण्यात आला त्या कलमांचे घटक शाबीत झालेले नाहीत. त्यामुळे ज्या कलमांन्वये आरोपींविरुद्ध निशाणी २४ वर दोषारोप निश्चिती झाली होती त्यातील एकही गुन्हा संशयातीतपणे सिध्द होवू शकलेला नाही. अशा परिस्थितीत केवळ पोलीस अधिकाऱ्याच्या साक्षीवर आधारित राहून

दोषसिद्धी करणे फौजदारी न्यायशास्त्राच्या मूलभूत तत्वांनुसार सुरक्षित मानता येत नाही, त्यामुळे अभियोगपक्षाने आवश्यक त्या दर्जाचा पुरावा न सादर केल्याने आरोपींना संशयाचा फायदा देवून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ व २ वर नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत**

२१] मुद्दा क्र. ३ करीता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ३ यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०७, ५०४, ५०६ सह कलम ३४ आणि शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ४/२५ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या दोषारोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जातमुचलका–बंध आणि जामिनदारांचे जामीनबंध रद्द करण्यात येत असून, आरोपींना बंधमुक्त आणि जामिनदारांना जामीनमुक्त करण्यात येत आहे.

३. खटल्यातील मूल्यहीन मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर फौजदारी नियमावलीच्या अधीन राहून नष्ट करण्यात येईल.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी ₹१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) इतक्या रकमेचे वैयक्तिक जातमुचलके तसेच त्याच रकमेची सक्षम जामिनदारांची बंधपत्रे द्यावयाची असून, ती आजच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी वैध राहतील.

५. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने *रंजना शांतीलाल सूर्यवंशी विरुद्ध जयप्रकाश तुळशीराम गुप्ता व इतर* या प्रकरणात दिनांक १६ जुलै

२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी या निर्णयाची एक प्रत ई–मेलद्वारे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना आज पाठविण्यात यावी. संबंधित ई–मेल डिलीव्हरी रिपोर्ट संबंधित लिपीकाने आजच पिठासीन अधिकारी यांची सही घेवून अभिलेखावर दाखल करावा.

६. वरील आदेशाने संबंधित खटला निकाली काढण्यात येत आहे.

सही/–

(डॉ सुधीर देशपांडे)

सत्र न्यायाधीश

सिंधुदुर्ग–ओरोस

SUDHIIR MAHADEO DESHPANDE

Digitally signed by SUDHIIR MAHADEO DESHPANDE
Date: 2026.05.04 19:43:43 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

भाग 'क'

## [फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. अभियोग साक्षीदार

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | ३७ | राजेंद्र श्रीधर कांबळे | फिर्यादी |
| सा.क्र.२ | ३८ | सूरज राजेंद्र कांबळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.३ | ३९ | राजश्री राजेंद्र कांबळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.४ | ४० | दत्ताराम अंकुश जाधव | पंच साक्षीदार |
| सा.क्र.५ | ४१ | अक्षय शांताराम बकाळकर | पंच साक्षीदार |
| सा.क्र.६ | ४२ | अनिल काशिनाथ हाडळ | तपासी अधिकारी |

**ब. बचावाचे साक्षीदार – निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदार – निरंक**

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | पी–१/पीडब्ल्यू–१ | प्रथम खबरवरील फिर्यादीची सही |
| २. | पी–२/पीडब्ल्यू–४ | आरोपी क्र. १ च्या निवेदनावरील पंचाची |

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | सही |
| ३. | पी–३/पीडब्ल्यू–४ | आरोपी क्र. १ च्या निवेदन पंचनाम्यावरील पंचाची सही |
| ४. | पी–४/पीडब्ल्यू–५ | आरोपी क्र. २ च्या निवेदनावरील पंचाची सही |
| ५. | पी–५/पीडब्ल्यू–५ | आरोपी क्र. २ च्या निवेदन पंचनाम्यावरील पंचाची सही |
| ६. | पी–६/पीडब्ल्यू–५ | आरोपी क्र. २ च्या निवेदन पंचनाम्यावरील पंचाची सही |
| ७. | पी–७ | घटनास्थळाचा पंचनामा (बचावपक्षाने मान्य केला) |
| ८. | पी–८ | फिर्यादीचे जखमेचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षाने मान्य केले) |
| ९. | पी–९ | सूरज राजेंद्र कांबळे याचे जखमेचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षाने मान्य केले) |
| १०. | पी–१० | फिर्यादी व साक्षीदार सूरज कांबळे यांच्या कपडे जप्तीचा पंचनामा (बचावपक्षाने मान्य केला) |
| ११. | पी–११ | आरोपी क्र. १ च्या कपडे जप्तीचा पंचनामा (बचावपक्षाने मान्य केला) |
| १२. | पी–१२ | आरोपी क्र. २ व ३ यांच्या कपडे जप्तीचा पंचनामा (बचावपक्षाने मान्य केला) |

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १३. | पी–१३/पीडब्ल्यू–६ | आरोपी क्र. १ चा अटक पंचनामा |
| १४. | पी–१४/पीडब्ल्यू–६ | आरोपी क्र. २ चा अटक पंचनामा |
| १५. | पी–१५/पीडब्ल्यू–६ | आरोपी क्र. ३ चा अटक पंचनामा |
| १६. | पी–१६/पीडब्ल्यू–६ | मुद्देमाल पावती |
| १७. | पी–१७/पीडब्ल्यू–६ | सूरज राजेंद्र कांबळे याचे जबाबातील भाग–ए खालील मजकूर |
| १८. | पी–१८/पीडब्ल्यू–६ | राजश्री राजेंद्र कांबळे हिचे जबाबातील भाग–ए खालील मजकूर |
| १९. | पी–१९/पीडब्ल्यू–६ | आरोपी क्र. १ चा निवेदन पंचनामा |
| २०. | पी–२०/पीडब्ल्यू–६ | आरोपी क्र. २ चा निवेदन पंचनामा |
| २१. | पी–२१/पीडब्ल्यू–६ | फिर्यादीच्या घराचा सातबारा उतारा |

**ब. बचाव – निरंक**

**क. न्यायालयीन निशाणी – निरंक**

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | एमओ–१/पीडब्ल्यू–६ | रक्तमिश्रीत माती |
| २. | एमओ–२/पीडब्ल्यू–६ | साधी माती |
| ३. | एमओ–३/पीडब्ल्यू–६ | रक्ताचा नमुना घेतलेला फिल्टर पेपर |

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ४. | एमओ–४/पीडब्ल्यू–६ | साधा फिल्टर पेपर |
| ५. | एमओ–५/पीडब्ल्यू–६ | पिवळया रंगाचे टीशर्ट, फिक्कट चॉकलेटी रंगाची हाफ पॅन्ट, राखाडी रंगाचे टीशर्ट, फिक्कट राखाडी रंगाचे टीशर्ट, काळया रंगाची ट्रॅक पॅन्ट, काळया रंगाचा शर्ट, राखाडी रंगाची हाफ पॅन्ट, करडया रंगाचा शर्ट, आणि करडया रंगाची फूल पॅन्ट. |

सही/–

(डॉ सुधीर देशपांडे)

सत्र न्यायाधीश

सिंधुदुर्ग–ओरोस

SUDHIIR MAHADEO DESHPANDE

Digitally signed by SUDHIIR MAHADEO DESHPANDE
Date: 2026.05.04 19:43:57 +0530

All concerned to act upon digitally signed uploaded copy of this order, the printout of which can be verified from the official website of this court. In this regard attention of all concerned is invited to the authority of the Hon'ble High Court of Bombay (Bench at Aurangabad) ***Shital Krushna Dhake v. Krushna Dhake***, MANU/MH0285/2018.